## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. १२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०१/२०१८

### १) विषारी औषध पिण्यास देवुन स्वत: सेवन करुन जिव घेण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०५/०१/२०१८ चे ०८.०० ते ०९.०० यातील फिर्यादीचा आरोपी पती याचे चारित्र्यावर फिर्यादीने संशय घेतल्याने त्यांच्यात भांडण झाले, यातील आरोपी याने आपले अल्पवयीन दोन्ही मुले १) ९ वर्ष व ७ वर्ष, यांना जानिव पुर्वक जिव घेण्याचे ईरादयाने कोणतेतरी विषारी द्रव्य पिण्यास देवुन व स्वत: देखील सेवन करुन दोन्ही मुलांचा जिव घेण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२८,३०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. सुनगार पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

### २) संगनमत करुन मैत्रेय प्लॉटर्स अ‍ॅन्ड स्ट्रक्चर प्रा. लि. लोकांची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २१/०१/२०११ पासुन आज पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करुन मैत्रेय प्लॉटर्स अ‍ॅन्ड स्ट्रक्चर प्रा. लि. वसई ठाणे व मैत्रेय स्वर्ण संधी प्रा. ली. बंगलोर ही कंपनी स्थापन करुन भंडारा येथे जिल्हा कार्यालय सुरु केला त्यात गुंतवणुक करण्यासाठी प्रतीनिधी तयार करुन यातील फिर्यादी व ईतर लोकांकडुन पैसे आवर्त ठेव व मुदत ठेव या योजने अंतर्गत गुंतवणुक करण्यास लावले, व ठेवीची मुदत पुर्ण झाल्यावर घ्यावयाची रक्कम फिर्यादी व ईतरांना परत न करता फिर्यादी व ईतर गुंतवणुक दारांची अंदाजे १५ करोड रुपयाची फसवणुक केल्याने यातील फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४०६,४०९,४२०,३४ भादवी. सहकलम ३,४,५,६ प्राईज चीट अ‍ॅन्ड मनी सर्कुलेशन अ‍ॅक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

### ३) संगनमत करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०५/०१/२०१८ चे १६.०० ते १६.४५ वाजता दरम्यान आरोपी क्र. २ हा फिर्यादीचे खोलीचे दारा समोर येवुन २००/—. ची नोट दाखवुन लैगींक शेरे मारुन तिला शारीरीक संबधाची मागणी केली? व फिर्यादीचा पती घरा समोर येताच त्याला आरोपी क्र. १ व २ ने संगनमत करुन मारपीट केली त्याला अश्लिल शब्दात बोलुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३५४(अ)(२)(४),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

### ४) संगनमत करुन विवाहीतेचा शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १०/०१/२०१७ पासुन आज पर्यत यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादी सोबत दिंनाक १०/०८/२०१७ ला प्रेम विवाह करुन ४ ते ५ दिवसांनी सोडुन पळुन गेला नंतर फिर्यादी पतीला भेटण्यास त्याचे युनिट मध्ये जावुन सोबत परत येत असतांना नागपुर येथे रेल्वे स्टेशनवर मारपीट केली तसेच भंडारा येथे आल्यावर सर्व आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला लग्ना मध्ये काही दिले नाही म्हणुन एटीएम मधुन ५०,०००/—रु. काढुन देशील तर घरी ये, असे म्हणुन शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व युवा महिला व मुलांकरीता समुपदेशन केन्द्र भंडारा यांचे दिनांक २८/१२/०१७ चे अहवाला वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

## ५) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु :–

दिनांक २२/१२/२०१८ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील मृतक आनंदराव भाकरु मनगटे वय ५५ वर्ष, रा. मोहाडी हा शहापुर बाजारातुन एनएच ६ रोड पासी क्रॉस करीत असतांना यातील अज्ञात आरोपी मोटार सायकलने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकास शहापुर एनएच ६ रोड समोर धडक मारुन जखमी करुन अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने मृतक यास जखमी अवस्थेत मेडीकल कॉलेज नागपुर येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. कांबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.